| वर्ष - 9 | अंक - 1 | UDYAM-MH-26-0158[illegible]7 |



79 वा भारतीय स्वातंत्र्य दिन चिरायू होवो!

# महाईन्यूज™

स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा
HAPPY INDEPENDENCE DAY

शुक्रवार, दिनांक 15 ऑगस्ट 2025 रोजी 79 व्या भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त **महाईन्यूज**च्या कार्यालयास सुट्टी असल्याने शनिवार दिनांक 16 जानेवारी 2025 चा अंक प्रकाशित होणार नाही. याची आमचे वाचक, जाहिरातदार, हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.

**79 व्या भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या खूप खूप शुभेच्छा -संपादक**

www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 15 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## असीम मुनीरमध्ये एवढी हिंमत ? फ्लोरिडा येथून धमकी, बोलविता धनी कोण?

# पाकड्यांची अणुबॉम्बची धमकी!

## भारताचे कडक शब्दात उत्तर, धाडस कराल तर याद राखा : मोठी किंमत चुकवावी लागेल, भारताची तंबी!



**। नवी दिल्ली / इस्लामाबाद । प्रतिनिधी । महाईन्यूज**

**पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांनी भारतावर अणुबॉम्ब टाकण्याची धमकी दिली आहे. त्यांच्या या धमकीला भारतानेही जोरदार प्रत्युत्तर दिले असून असे काही धाडस कराल तर याद राखा, पाकिस्तानला फार मोठी किंमत चुकवावी लागेल असे भारताने म्हटले आहे. दरम्यान, मुनीर यांनी फ्लोरिडा येथून ही धमकी दिली असून त्यांचा 'बोलविता धनी' कोण आहे? याचा शोध सुरू आहे.**

**मुनीर यांच्या विधानाला वजन..**

असीम मुनीर हे पाकिस्तानी लष्करात सर्वोच्च पदावर आहेत. त्यामुळे त्यांनी केलेल्या प्रत्येक विधानाला वेगळे महत्त्व प्राप्त होते. पाकिस्तानने याआधीही भारताला अण्वस्त्रहल्ला करण्याची धमकी दिलेली आहे. अशा प्रकारची धमकी देऊन पाकिस्तान भारताला भीती घालण्याचा प्रयत्न करत आहे पण भारत सतर्क आहे असे लष्करांकडून सांगण्यात आले.

**भारताला धमक्या देण्याचा सपाटा..**

पाकचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांनी फ्लोरिडात असताना भारताविरोधात अण्वस्त्रहल्ला करण्याची उघड धमकी दिली. त्यांनी जणू भारताला धमक्या देण्याचा सपाटाच लावला आहे. सध्या पाकिस्तान आणि भारत यांच्यात तणावाची स्थिती असली तरी दोन्ही देशांनी एकमेकांवर कोणताही हल्ला केलेला नाही. त्यामुळेच मुनीर यांनी ही धमकी का दिली?असा प्रश्न अनेकांना पडला आहे.

**भारताकडे 180 अण्वस्त्रे..**

सध्या पाकिस्तानकडे एकूण १६० तर भारताकडे एकूण १८० अण्वस्त्र आहेत. या पार्श्वभूमीवर मुनीर यांनी यावेळी परदेशात जाऊन भारताला अण्वस्त्रहल्ला करण्याची धमकी दिली आहे. त्यांच्या या धमकीतून पाकिस्तानला दक्षिण आशियाला पुन्हा एकदा अस्थिरतेकडे न्यायचे आहे, असा कयास लावला जात आहे.

**पाकिस्तानात लष्कर सर्वेसर्वा..**

पाकिस्तानात लष्कराची सत्ता आहे हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. तसेच पाकिस्तानमध्ये लष्कराचा राजकीय निर्णय घेण्यात हस्तक्षेप असतो, असे म्हटले जाते. सध्या मुनीर यांनी भारतावर अण्वस्त्रहल्ला करण्याची धमकी दिल्याने पाकिस्तानमध्ये जनतेने निवडून दिलेल्या सरकारची नव्हे तर अप्रत्यक्षपणे लष्कराचीच सत्ता असते, असाही निष्कर्ष काढला जात आहे.

**संबंध सुधारले, पण..**

'ऑपरेशन सिंदूर' नंतर अमेरिका आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध सुधारले आहेत. पाकिस्तानमध्ये आपला व्यापार विस्तार व्हावा, या उद्देशाने अमेरिकेकडून पाकिस्तानला झुकते माप दिले जात आहे. असे असतानाच आता मुनीर यांनी थेट अमेरिकेत जाऊन भारताला धमकी दिली आहे. त्यामुळे आता अमेरिकेच्या जीवावर तर पाकिस्तान अशा प्रकारची आगळीक करत नाहीना? असेही आंतरराष्ट्रीय स्तरावर विचारले जात आहे.

**भडकाऊ युद्धाची वक्तव्ये..**

पाकिस्तानकडून सुरू असलेल्या भडकाऊ आणि युद्धछेडीच्या वक्तव्यांवर भारताने गुरुवारी कडक शब्दात प्रत्युत्तर दिले. पाकिस्तानने आपल्या वक्तव्यावर नियंत्रण ठेवावे, तसेच नको ते धाडस करू नये, अन्यथा त्यांना मोठी किंमत चुकवावी लागेल असा कडक इशारा भारताने पाकिस्तानला दिला आहे. मुनीर यांच्या पाठोपाठ पंतप्रधान शहबाज शरीफ यांनीही अशीच बेताल वक्तव्ये केली आहेत. शरीफ यांनी दोन दिवसांपूर्वी म्हटले होते, की, भारत आमचे पाणी अडवणार असेल तर त्याला योग्य तो धडा शिकवला जाईल.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यात २६ जण ठार झाल्यानंतर भारताने दि. २३ एप्रिलरोजी सिंधू पाणी वाटप करार स्थगित करण्याचा निर्णय घेतला. पाणी आणि रक्त एकत्र वाहू शकत नाही, अशी भारताने भूमिका घेतली. त्यावर पाण्याचा प्रवाह रोखणे म्हणजे युद्ध समजले जाईल, असे वक्तव्य पाकिस्तानने केले होते.

**पाकिस्तान युद्धाला तयार : भुट्टो**

## भारताची ताकद माहीत आहे..!

पाकिस्तानने कितीही धमक्या दिल्या, तरीही भारताची ताकद काय हे त्यांना माहीत आहे, असे भारताच्या लष्करी प्रवक्त्याने म्हटले आहे. ऑपरेशन सिंदूर संपलेले नाही. पाकिस्तानने काहीही आगळीक केली तरी भारतीय लष्कर सतर्क असल्याचे सांगण्यात आले. मागच्या लष्करी कारवाईच्या वेळी भारताने पाकिस्तानात घुसून त्यांचे दहशतवादी अड्डे उध्वस्त केले होते, याची आठवण भारताने करून दिली आहे.

## धमकी सहन करणार नाही" : PM मोदीं

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 79 व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त देशाला संबोधित केलं. आपल्या भाषणाची सुरुवात त्यांनी स्वातंत्र्यदिन हा 140 कोटी देशवासियांसाठी 'संकल्पांचा, सामूहिक सिद्धींचा आणि गौरवाचा' दिवस असल्याचे सांगून केली. यावेळी त्यांनी 'ऑपरेशन सिंदूर' या लष्करी कारवाईचा उल्लेख करत पाकिस्तानला दहशतवादाच्या मुद्द्यावरून कठोर संदेश दिला. देशाच्या 79 व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून राष्ट्राला संबोधित केले.

कॅरी फॉरवर्ड

## नॅशनल स्टुडंट्स युनिअन ऑफ इंडियाने आंदोलन

# ‘कॅरी फॉरवर्ड’बाबत विद्यापीठाचा मोठा निर्णय!

## ४० हजार विद्यार्थ्यांचे नुकसान

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पदवीच्या पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षातील ‘बॅक लॉग’मुळे तिसऱ्या, चौथ्या आणि पाचव्या वर्षात प्रवेश घेण्यास पात्र नसलेल्या सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेची विशेष संधी देण्याचा निर्णय घेतला आहे.या विद्यार्थ्यांना ‘कॅरी फॉरवर्ड’ मिळत नसल्याने सुमारे ४० हजार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा आरोप करून नॅशनल स्टुडंट्स युनिअन ऑफ इंडियाने (एनएसयुआय) गुरुवारी आंदोलन केले. त्यास सकारात्मक प्रतिसाद देऊन शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील सर्व विद्यार्थ्यांना ‘कॅरी फॉरवर्ड’ देत असल्याचा निर्णय घेतल्याची माहिती परीक्षा आणि मूल्यमापन विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनी आंदोलनस्थळी दिली. त्याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.**



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांना पदवीच्या पहिल्या वर्षातील काही विषयांत नापास झाल्याने तिसऱ्या वर्षात प्रवेश मिळत नाही. पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षात ‘बॅक लॉग’ राहिलेल्या विद्यार्थ्यांना ‘कॅरी फॉरवर्ड’ न देण्याच्या नियमामुळे तिसऱ्या, चौथ्या आणि पाचव्या वर्षात प्रवेश मिळत नाही. त्यामुळे सुमारे ३० हजार ते ४० हजार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा आरोप ‘एनएसयूआय’च्या वतीने करण्यात आला होता. ‘एनएसयूआय’सह काही विद्यार्थी संघटनांनी आंदोलन करून विद्यार्थ्यांना ‘कॅरी फॉरवर्ड’ देण्याची मागणी केली होती. विद्यार्थ्यांची मागणी मान्य करण्यात आली असून, काही अटी आणि नियमांच्या अधीन राहून विद्यार्थ्यांना या वर्षी विशेष संधी देण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे.प्रथम वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना तृतीय वर्षाच्या पाचव्या सत्राकरिता, द्वितीय वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना चतुर्थ वर्षाच्या सातव्या सत्राकरिता, तृतीय वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना पाचव्या वर्षाच्या नवव्या सत्राकरिता तात्पुरता प्रवेश देण्यात येणार असून, प्रवेश देण्याची पात्रता ही उन्हाळी सत्र परीक्षा २०२४-२५ च्या निकालाऐवजी हिवाळी सत्र परीक्षा २०२५-२६ निकालांवर ठरविण्यात येणार असल्याचे विद्यापीठाने जाहीर केले आहे. तात्पुरता प्रवेश देताना विद्यापीठाने विद्यार्थ्यांना काही अटी घातल्या आहेत. विद्यार्थ्यांनी हमीपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तात्पुरता प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना नियमित विद्यार्थ्यांप्रमाणेच अभ्यास, प्रात्यक्षिके, सत्रकार्य, क्षेत्रभेट आदी बाबी पूर्ण कराव्या लागणार आहेत. हिवाळी सत्र २०२५-२६ परीक्षेत पुन्हा ‘बॅक लॉग’ लागल्यास तात्पुरता प्रवेश रद्द करण्यात येणार असून, संबंधित विद्यार्थ्याचे शुल्कही परत मिळणार नसल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे. विद्यार्थ्यांना उन्हाळी सत्राच्या परीक्षांबरोबरच परीक्षा द्यावी लागणार असल्याचेही विद्यापीठाकडून सांगण्यात आले. पदवीच्या पहिल्या वर्षातील काही विषयांत नापास झाल्याने तिसऱ्या वर्षात प्रवेश मिळत नाही. पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षांत ‘बॅक लॉग’ राहिलेल्या विद्यार्थ्यांना ‘कॅरी फॉरवर्ड’ न देण्याच्या नियमामुळे तिसऱ्या, चौथ्या आणि पाचव्या वर्षात प्रवेश मिळत नाही. त्यामुळे सुमारे ३० हजार ते ४० हजार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा आरोप ‘एनएसयूआय’च्या वतीने करण्यात आला होता. ‘एनएसयूआय’सह काही विद्यार्थी संघटनांनी आंदोलन करून विद्यार्थ्यांना ‘कॅरी फॉरवर्ड’ देण्याची मागणी केली होती. विद्यार्थ्यांना या वर्षी विशेष संधी देण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहेतात्पुरता प्रवेश देण्यात येणार असून, प्रवेश देण्याची पात्रता ही उन्हाळी सत्र परीक्षा २०२४-२५ च्या निकालाऐवजी हिवाळी सत्र परीक्षा २०२५-२६ निकालांवर ठरविण्यात येणार असल्याचे विद्यापीठाने जाहीर केले आहे.

### ‘कॅरी फॉरवर्ड’ देण्याची मागणी

तात्पुरता प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना नियमित विद्यार्थ्यांप्रमाणेच अभ्यास, प्रात्यक्षिके, सत्रकार्य, क्षेत्रभेट आदी बाबी पूर्ण कराव्या लागणार आहेत. हिवाळी सत्र २०२५-२६ परीक्षेत पुन्हा ‘बॅक लॉग’ लागल्यास तात्पुरता प्रवेश रद्द करण्यात येणार असून, संबंधित विद्यार्थ्याचे शुल्कही परत मिळणार नसल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

# मेट्रोची धाव आता निगडीतून चाकणपर्यंत

## सविस्तर प्रकल्प आराखडा पिंपरी-चिंचवड महापालिकेला सादर

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहरात निगडी ते चाकण दरम्यान दुसरा मेट्रो मार्ग साकारला जाणार आहे. ३१ स्थानके असलेल्या या ४०.९२६ किलोमीटर अंतराच्या मार्गासाठी दहा हजार ३८३ कोटी ८९ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. या मार्गामुळे पिंपरी-चिंचवड, चाकण एमआयडीसीचा भाग मेट्रोने जोडला जाणार आहे. या प्रस्तावित मार्गाचा सविस्तर प्रकल्प आराखडा (डीपीआर) महामेट्रोने पिंपरी-चिंचवड महापालिकेला सादर केला आहे.**




पिंपरी-चिंचवड शहरात सद्य:स्थितीत दापोडी ते पिंपरी अशी मेट्रो धावत आहे. या मार्गाचे निगडीतील भक्ती-शक्ती समूहशिल्प चौकापर्यंत ४.५१९ अंतर विस्तारीकरणाचे काम सुरू आहे. दापोडी ते निगडी या एकमेव मेट्रो मार्गानंतर आता निगडीतील भक्ती-शक्ती समूह शिल्प चौक ते चाकण असा दुसऱ्या मार्गाचा आराखडा तयार झाला आहे. महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने (महामेट्रो) आराखडा महापालिकेकडे सादर केला आहे. सध्या असलेल्या मेट्रोमार्गिकेप्रमाणेच हा मार्गही उन्नत असणार आहे. या एकूण १० हजार ३८३ कोटी ८९ लाख खर्चाच्या आराखड्यामध्ये ३१ मेट्रो स्थानके असणार आहेत. त्यांपैकी २५ पिंपरी-चिंचवड हद्दीत असतील.या नव्या मार्ग, स्थानकांसाठी महापालिका ३३ कोटी रुपये किमतीची १५ हजार ९०९.६५ चौरस मीटर जागा देणार आहे. राज्य शासनाची एक लाख ३४ हजार ८४१.८३ चौरस मीटर जागा आहे. त्या जागेचे मूल्य ७७ कोटी आठ लाख आहे. तर, ७२ कोटी २८ लाख रुपये मूल्याची १८ हजार ४७४.१८ चौरस मीटर क्षेत्रफळाची खासगी जागा घेण्यात येणार आहे.

### कसा असेल मार्ग?

महापालिका सभेने मान्यता दिल्यानंतर आराखडा राज्य शासनाकडे पाठविला जाणार आहे. राज्य शासनाकडून तो केंद्र शासनाकडे पाठविला जाईल. केंद्राकडून अंतिम मान्यता मिळाल्यानंतर प्रत्यक्ष मार्गाचे काम सुरू होईल. या प्रकल्पामुळे पिंपरी-चिंचवडचा ७५ टक्के भाग मेट्रोने जोडला जाईल, असे महापालिका अधिकाऱ्यांनी सांगितले.

निगडी ते चाकण मेट्रो ३१ स्टेशन , ४०.९२६ किलोमीटर अंतराचा मार्ग

# 10 हजार कोटींचा डीपीआर तयार!

## पिंपरी-चिंचवड व चाकण एमआयडीसी, हिंजवडी आयटी पार्कचा भाग मेट्रोने जोडला जाणार

।पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहरात मेट्रोचा दुसरा मार्ग साकारला जाणार आहे. निगडी ते चाकण या ३१ स्टेशन असलेल्या ४०.९२६ किलोमीटर अंतराच्या मार्गासाठी एकूण १० हजार ३८३ कोटी ८९ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. या मार्गामुळे पिंपरी-चिंचवड व चाकण एमआयडीसी तसेच, हिंजवडी आयटी पार्कचा भाग मेट्रोने जोडला जाणार आहे.**






पिंपरी-चिंचवड उद्योगनगरीत सध्या दापोडी ते पिंपरी अशी मेट्रो धावत आहे. या मार्गाचा निगडी येथील भक्ती शक्ती समूह शिल्प चौकापर्यंत ४.५१९ अंतर विस्तारीकरणाचे काम सुरू आहे. दापोडी ते निगडी या एकमेव मेट्रो मार्गानंतर आता, निगडीच्या भक्ती-शक्ती समूह शिल्प चौक ते चाकण असा दुसऱ्या मार्गाचा आराखडा तयार झाला आहे. महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महामेट्रो) ने डीपीआर पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे सादर केला आहे.

सध्या असलेल्या मेट्रो मार्गिकेप्रमाणेच हा मार्ग उन्नत (एलिव्हेटेड) असणार आहे.

या एकूण १० हजार ३८३ कोटी ८९ लाख खर्चाचा डीपीआरमध्ये एकूण ३१ मेट्रो स्टेशन आहेत. पिंपरी-चिंचवड शहरात सर्वाधिक २५ स्टेशन आहेत. त्यातील नाशिक फाटा ते संत तुकारामनगर मेट्रो स्टेशन असे १.३३६ किलोमीटर अंतराचा मार्ग तयार आहे

### निगडी ते चाकण मेट्रोची वैशिष्ट्ये

पिंपरी-चिंचवड शहरात एकूण २५ मेट्रो स्टेशन चाकण नगरपालिका हद्दीत ६ मेट्रो स्टेशन एकूण अंतर ४०.९२६ किमी. एकूण खर्च - १० हजार ३८३ कोटी ८९ लाख रुपये

### पुढील टप्प्यातील कार्यवाही

डीपीआर सादर केल्यानंतर राज्य सरकारची मान्यता आणि केंद्र सरकारकडून अंतिम मंजुरी घेऊन प्रकल्पाला प्रत्यक्ष सुरुवात केली जाईल.

### महापालिकेचा १५ ते २० टक्के हिस्सा

निगडी ते चाकण मेट्रो मार्गाच्या प्रकल्पासाठी एकूण १० हजार ३८३ कोटी ८९ लाख खर्च अपेक्षित आहे. त्या खर्चात केंद्र शासनाचा १० टक्के आणि राज्य शासनाचा १० टक्के हिस्सा असणार आहे. तर, पिंपरी-चिंचवड महापालिकेचा खर्चाचा हिस्सा १५ ते २० टके असणार आहे. उर्वरित ६० टक्के निधी कर्जातून उभारला जाणार आहे.

### भोसरी डिस्ट्रीक्ट सेंटर येथे डेपो

इंद्रायणीनगर, भोसरी येथील डिस्ट्रीक्ट सेंटर येथे मेट्रोचा डेपो उभारला जाणार आहे. डिस्ट्रीक्ट सेंटरसाठी पीएमआरडीएने एकूण १२.०४ हेक्टर जागा आरक्षित केली आहे. या जागेशशेजारी डेपो असणार आहे. डेपोत मेट्रो कोचची दुरुस्ती व देखभाल तसेच, नियमित स्वच्छता केली जाणार आहे.

### असा असेल मार्ग

निगडीतील भक्ती-शक्ती समूहशिल्प चौक, ट्रान्सपोर्टनगर, गणेशनगर, मुकाई चौक, रावेत, पुनावळे गाव, पुनावळे, ताथवडे गाव, ताथवडे, भूमकर चौक, भुजबळ चौक, वाकड, विशालनगर कॉर्नर, कोकणे चौक, पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, नाशिक फाटा, संत तुकारामनगर, वल्लभनगर (वायसीएमजवळ), गवळीमाता चौक, भोसरी एमआयडीसी, वखार महामंडळ गोदाम चौक, पीआयईसी, मोशीतील भारतमाता चौक, चिंबळी फाटा, बर्गेवस्ती, कुरळी, आळंदी

“ फाटा, नाणेकरवाडी, चाकण निगडी ते चाकण मेट्रो मार्गाचा डीपीआर प्राप्त झाला आहे. त्यासंदर्भात महापालिका व महामेट्रोच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक होणार आहे. त्या डीपीआरबर सखोल चर्चा होईल. त्यानंतर त्याबाबत मुख्यमंत्र्यांकडे सादरीकरण केले जाईल. राज्याकडून मंजुरी मिळाल्यानंतर डीपीआर केंद्राकडे पाठविला जाईल. या प्रकल्पासाठी महापालिकेचा हिस्सा जमीन व निधी या माध्यमातून दिला जाईल. पिंपरी-चिंचवड शहरासाठी मेट्रो गरजेची आहे,

**-शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका

# अग्निशामक दलात सायबर जनजागृती मोहीम उत्साहात

## ‘सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा’ उपक्रमांतर्गत डिजिटल सुरक्षा विषयक मार्गदर्शन

।पुणे।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: कुदळवाडी चिखली येथील लघु उद्योजकांसाठी महानगरपालिकेने औद्योगिक पार्क बनवून उद्योजकांचे पुनर्वसन करावे. उद्योजकांना महापालिका व महाराष्ट्र शासनाने नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी लघु उद्योजक संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे यांनी विधानसभा उपसभापती अण्णा बनसोडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.**



पिंपरी-चिंचवड: सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर सायबर सुरक्षिततेबाबत जनजागृती करणे ही काळाची गरज बनली आहे. याच उद्देशाने प्रतीभा कॉलेज ऑफ कॉमर्स अॅन्ड कॉम्प्युटर स्टडीज आणि क्विक हिल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ‘सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा’ या उपक्रमांतर्गत अग्निशामक दलासाठी विशेष जनजागृती मोहीम आयोजित करण्यात आली. ही मोहीम उत्साहात पार पडली.


प्राधिकरण येथील अग्निशामक दलाच्या कार्यालयात आयोजित या अभियानात, अधिकाऱ्यांना पासवर्ड व्यवस्थापन, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, फिशिंग व व्हॉट्सअ‍ॅप फसवणूक ओळखणे आणि टाळणे, तसेच बँक व सरकारी फसवणुकीबाबत जागरुक राहण्याचे उपाय याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. प्रात्यक्षिके व व्हिडिओच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांमध्ये डिजिटल जागरूकता वाढवण्यात आली.

या उपक्रमात कॉलेजमधील गायत्री गुंजालोर, फैसल इस्लाम, रोनित चौधरी आणि दुर्वा साळुंखे यांनी महत्त्वपूर्ण माहिती सादर केली. उपस्थित अधिकाऱ्यांनी या माहितीचा सकारात्मक प्रतिसाद देत, सायबर सुरक्षेबाबत नव्याने जागरुक होण्याची तयारी दर्शवली. या यशस्वी उपक्रमामागे डॉ. दीपक शहा यांचे मार्गदर्शन, डॉ. भूपाली शहा, डॉ. तेजल शहा यांचे सहकार्य व प्रकल्प समन्वयिका डॉ. हर्षिता वाच्छानी यांचे प्रभावी संयोजन होते. तसेच श्रावणी सावंत (अध्यक्षा), आकाश ठाकूर (सचिव), ऑलिव वर्गीस (संचालक), मानसी वाडेकर (मीडिया डायरेक्टर) यांचा मोलाचा वाटा होता. क्विक हिल सीएसआर प्रतिनिधी म्हणून अजय शिर्के, गायत्री केसकर आणि दीपू सिंह यांनी मार्गदर्शन केले.

### मोहीमेचा सकारात्मक परिणाम...

या मोहिमेमुळे अग्निशमन दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबतची जाणीव अधिक बळकट झाली असून, सुरक्षित डिजिटल व्यवहार करण्याची सवय जोपासली जाणार आहे. हा उपक्रम सर्वच स्तरांवरून यशस्वी व प्रेरणादायक ठरला आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### शाश्वत आनंद फक्त भगवंताजवळच.

जगात प्रत्येक मनुष्य स्वत:ला आनंद मिळावा म्हणून धडपडतो आहे. किंबहुना, आनंद नको असे म्हणणारा मनुष्य मिळणारच नाही. म्हणजे मनुष्याला आनंद हवाच असतो. मग इतक्या धडपडीतून त्याला आनंद, समाधान, का बरे न मिळावे ? याला कारण असे की, हा शाश्वत आनंद एका भगवंतावाचून दुसऱ्या कुठेही मिळणे शक्य नसल्याकारणाने त्याचे प्रयत्न व्यर्थ आहेत. त्या आनंदासाठी, मला भगवंत पाहिजे असे मनापासून वाटले पाहिजे; आणि त्यासाठीच, आपण सर्वांनी नाम घेणे आवश्यक आहे. आपले मन भगवंताच्या चरणावर चिकटवून ठेवावे, आणि देह प्रारब्धाच्या प्रवाहामध्ये सोडून द्यावा. कधी तो सुखात राहील तर कधी दु:खात राहील; कधी तो बरेच दिवस सरळ जाईल, तर कधी तो मध्येच गचका खाऊन बुडायच्या बेताला येईल; पण त्याच्या कोणत्याही अवस्थेमध्ये आपला आनंद कायम राहील. तुम्ही सर्व माणसे फार चांगली आहात, भगवंताचे नाम घेता, हे मला माहीत आहे. परंतु नामाचे प्रेम तुम्हाला येत नाही हे पाहून मला फार वाईट वाटते. तुमच्यापैकी प्रत्येकाने मनापासून विचार करून ठरवा, की मला नामाचे प्रेम येण्याच्या आड काय येत असेल बरे ? तुमची परिस्थिती आड येते का ? इथे मंदिरात राहणाऱ्या माणसांनी तरी नामाचे प्रेम यायला परिस्थिती आडवी येते असे म्हणणे बरोबर नाही. तुम्ही इथे आनंदाने राहा, मंदिरात जेवा, आणि 'राम राम' म्हणा असे मी सांगतो. पण या लोकांनीसुद्धा नामाचे प्रेम यायला परिस्थिती आड येते असे म्हटले तर बाहेरून येणाऱ्या लोकांना मी काय सांगू ? खरोखर, मनुष्य आनंदासाठी न जगता वस्तूसाठी जगतो असेच म्हणावे लागते. वस्तू ही सत्य नसल्यामुळे तिचे रूप अशाश्वत असते. अर्थात् तिच्यापासून मिळणारा आनंद हा देखील अशाश्वत असतो. खरा आनंद हा वस्तूमध्ये नसून वस्तूच्या पलीकडे आहे. आपण भगवंताजवळ आनंद मागावा. त्याने वस्तू आणि आनंद दोन्ही दिले तर फारच बरे. मात्र चिरकाल टिकणारा आनंद हा नेहमी वस्तुरहितच असतो. एका स्टेशनवर पेरू चांगले मिळतात म्हणून एकजण गाडीतून खाली उतरला ? तो पेरू घेण्याच्या नादी किती लागेल, तर आपली गाडी न चुकण्याइतका ! हे जसे खरे, त्याप्रमाणे आनंदाच्या आड येणाऱ्या वस्तूंच्या मागे लागणे बरे नाही. आनंद जोडणाऱ्या गोष्टीचा आपण विचार करू या, आणि नामस्मरणात राहू या. काल जे झाले त्याबद्दल दु:ख करू नये; उद्या काय होणार याची काळजी करू नये, आज मात्र आनंदात आपले कर्तव्य करावे.

बोधवचन:- वेळ सापडताच तो व्यर्थ गप्पागोष्टीत न घालविता नामस्मरण करावे.



## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक

**सध्या आपल्या देशामध्ये 'ईव्हीएम' च्या मुद्द्यावर गदारोळ सुरू आहे. त्यामध्ये काही त्रुटी असतील, तर टेक्निकली त्यात सुधारणा करायला हवी. तथापि, 'ईव्हीएम' ला सरसकट विरोध करणे हा मूर्खपणा ठरेल.. पुन्हा 'बॅलेट' पेपरवर म्हणजेच मतपत्रिकांद्वारे निवडणुका घ्या, म्हणणे म्हणजे तर अकलेची दिवाळखोरीच आहे !**

# 'ईव्हीएम' मध्ये सुधारणा आवश्यक, सरसकट विरोध म्हणजे मूर्खपणा !



### बॅलेट पेपर मध्येही घोळ होताच..

आपल्या देशात पूर्वी मतदान बॅलेट पेपरवर होत होते. त्या काळातही मतपेट्या लुटणं, मतपत्रिका फाडणं, बनावट मतपत्रिका टाकणं, हिंसाचार, जबरदस्ती, गोळीबार हे सर्व मतदान प्रक्रियेच्या काळ्या अध्यायापैकी होते.

### बोटाला शाई लावण्यालाही विरोध..

१९६२ मध्ये पहिल्यांदा मतदारांच्या बोटाला शाई लावण्याची पद्धत लागू झाली, तेव्हा राजकीय नेते आणि मतदारांनी याला वैयक्तिक स्वातंत्र्यावरचा हस्तक्षेप मानला. 'बोटावर जबरदस्तीने डाग लावणं' ही बाब विशेषतः शिक्षित आणि मध्यमवर्गीय मतदारांना अपमानासारखी वाटत होती. काही जणांनी तर धार्मिक कारणंही सांगितली. शरीरावर कायमस्वरूपी किंवा दीर्घकाळ टिकणारा रंग लावणं, हे अयोग्य असल्याची भावना व्यक्त झाली. तांत्रिक पातळीवर काही पक्षांनी ही शाई पूर्णपणे 'न पुसता येणारी' नाही, असाही आरोप केला. काही ठिकाणी मतदारांनी मतदानानंतर लगेच ती पुसून दुसऱ्या मतदान केंद्रावर मतदान केल्याच्या बातम्या आल्या आणि त्यामुळे शाईच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह लावलं गेलं. विशेषतः काँग्रेसच्या प्रचंड विजयांच्या काळात विरोधी पक्षांनी असा संशय व्यक्त केला की शाई पुसण्याच्या तंत्रांचा वापर करून काही भागात मोठ्या प्रमाणात दुबार मतदान झालं.

### आधुनिक तंत्रज्ञानाला नेहमीच विरोध..

पुढच्या काही वर्षात थेट शाई लावण्याची पद्धत बंद करण्यापेक्षा शाईच्या दर्जात सुधारणा करून निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यात आली. १९८० च्या दशकात राजीव गांधींनी कॉम्प्युटर भारतात आणले, तेव्हा त्यांना प्रचंड विरोधाचा सामना करावा लागला. कामगार संघटना संपावर गेल्या, डाव्या पक्षांनी बोंब ठोकली की कॉम्प्युटर बेरोजगारी वाढवतील, ग्रामीण गरजांऐवजी 'श्रीमंतांच्या खेळण्यावर' पैसा उधळला जातोय, असा आरोप झाला. माध्यमात भीती पसरवणारे लेख छापले गेले आणि 'कॉम्प्युटर आल्याने माणूस मागे पडेल', अशा अफवा पसरल्या. पण, राजीव गांधी ठाम राहिले. त्यांनी स्पष्ट केलं, की कॉम्प्युटर नोकऱ्या कमी करणार नाहीत, तर नवे रोजगार निर्माण करतील. शिक्षणांत, बँकांत, सरकारी कार्यालयांत त्यांनी कॉम्प्युटर बसवून दाखवून दिलं आणि भारताची 'आयटी क्रांती' सुरू झाली.

### पुन्हा जुन्या पर्वाकडे..

आज काही दशकांनी, आश्चर्य म्हणजे त्यांचीच अपत्ये प्रियंका गांधी- वड्रा आणि राहुल गांधी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र म्हणजेच ईव्हीएमला विरोध करून पुन्हा बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याची मागणी करत आहेत. हा हट्ट म्हणजे कॉम्प्युटरवरून टाईपरायटरकडे परत जाण्यासारखा किंवा एलईडी बल्ब फेकून पुन्हा कंदील पेटवण्यासारखा आहे..

### ईव्हीएम आता अविभाज्य घटक..

खरं तर, गेल्या दशकांपासून ईव्हीएम भारतीय निवडणूक प्रक्रियेचा अविभाज्य भाग आहेत. त्यांच्यामुळे मतदान जलद, सुरक्षित आणि मानवी चुका कमी करणारे झालं, हे खरं आहे. तरीसुद्धा,शंकेची पाल या ईव्हीएममुळे चुकचुकत आहे. काही राजकीय पक्ष, कार्यकर्ते आणि बहुसंख्य मतदारांचा गट सतत हा सूर लावतो की 'ईव्हीएम हॅक' होऊ शकतात, मतं वळवली जाऊ शकतात, निकालांमध्ये फेरफार होऊ शकतो. निवडणूक संपली की पराभूतांचं पहिलं वाक्य बहुतेक वेळा ठरलेलं असतं 'ईव्हीएम मॅनेज केलं!'

### विमान नको, बैलगाडी हवी !

आजची राजकीय परिस्थिती अशी आहे, की बहुतेक विरोधी पक्षांनी ईव्हीएम विरोधात शस्त्र उचललं आहे. लोकांचा कानोसा घेतला तरीही अनेकांच्या मनात संशय दिसतो. ईव्हीएम ही निर्दोष, परिपूर्ण प्रणाली आहे, असं म्हणणं खरंच अवघड आहे. प्रत्येक यंत्रणेत सुधारणा करायची जागा असतेच. पण, म्हणून ती संपूर्ण पद्धतच उपटून फेकून देणं आणि पुन्हा बॅलेट पेपरच्या युगात परत जाण्याचा हट्ट धरणं, हा तर्काचा नव्हे तर भावनिक राजकारणाचा भाग ठरावा. देश ज्या काळात विमानसेवा अधिक वेगवान आणि सुरक्षित करण्याचं स्वप्न पाहतोय, त्या काळात आपण बैलगाडीतून प्रवास करण्याची अपेक्षा करतोय, इतकी ही मागणी मागासलेली आहे.

### दोष असतीलही, पण सुधारा ना..

ईव्हीएम मध्येही दोष असतील तर त्यात सुधारण्याचा मार्ग शोधणं हे सूज्ञपणाचं आहे. तांत्रिकदृष्ट्या ईव्हीएम सुरक्षित आहेत, असा आयोगाचा दावा असला तरी पारदर्शकता वाढविण्यासाठी त्यासोबत पूरक साधनं असणं आवश्यक आहे. यासाठीच व्हीव्हीपॅट प्रणालीचा अवलंब करण्यात आला होता. मतदाराने बटन दाबल्यानंतर काही सेकंदासाठी त्याच्या मताची पावती पडद्यामागे दिसावी आणि ती सुरक्षित पेटीत जमा व्हावी, ही या यंत्रणेची रचना आहे. यातून मतदाराला स्वतःच्या मतदानाची खात्री मिळते आणि मतमोजणीत शंका आल्यास त्या पावत्यांची मोजणी करून निकाल पडताळता येतो. त्यामुळे भविष्यातही व्हीव्हीपॅट प्रणाली स्थानिक स्वराज्य संस्थांच्या किंवा कितीही लहान असल्या तरी सर्व निवडणुकांमध्ये वापरली जाणे आवश्यक आहे. त्यासाठी तांत्रिक सुधारणा, पुरेशी उपकरणं, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि पारदर्शक साठवण तसेच मोजणीची प्रक्रिया हवी, हे मात्र नक्की !

तंत्रज्ञान सुधारायलाच हवे !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.

**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

मिष्किल वक्तव्य

## स्वातंत्र्य दिनी लोकांचं स्वातंत्र्य हिरावून घेऊ नका-राज

# मी मटण हंडीचं आमंत्रण स्वीकारतो!

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्रात सध्या १५ ऑगस्टच्या मांस विक्री बंदीच्या निर्णयावरून वाद सुरू आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी एक मिष्किल वक्तव्य केलं आहे. प्रभादेवी येथील दहीकाला उत्सवासाठी राज ठाकरे यांना निमंत्रण देण्यात आले होते. या निमंत्रणाचा स्वीकार करताना राज ठाकरे यांनी म्हटले की, “मी फक्त मटण हंडीचं आमंत्रण स्वीकारतो.” त्यांच्या या वक्तव्यामुळे मांस विक्री बंदीच्या मुद्द्यावर सुरू असलेल्या चर्चेत आणखी भर पडली आहे.**

## शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरु आहेत



## कुणी काय खायचं :राज ठाकरे

माध्यमांशी बोलत असताना त्यांना हा प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर त्यांनी म्हटले की, स्वातंत्र्यदिनाच्या दिवशीच लोकांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले जात आहे असं राज ठाकरे म्हणाले.राज ठाकरे यांना यासंबंधीचा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता ते म्हणाले, “आमच्या लोकांना हे सर्व चालू ठेवण्यास सांगितले आहे. महानगरपालिकेला या गोष्टीचे अधिकार नाहीत.

प्रभादेवी दही काला उत्सवाचं निमंत्रण द्यायला त्या मंडळाचे सदस्य गेले होते. तेव्हा राज ठाकरे म्हणाले, “हंडीचं आमंत्रण? मी फक्त मटण हंडीचं आमंत्रण स्वीकारतो बरं का.” ज्यानंतर उपस्थितांमध्ये हशा पिकला. दरम्यान महापालिकांनी १५ ऑगस्टला मांस विक्रीची भूमिका घेतली आहे त्यावरही राज ठाकरेंनी प्रतिक्रिया दिली. राज ठाकरे यांचं राजकारणातलं टायमिंग जसं चांगलं आहे तशीच त्यांची विनोदबुद्धीही उत्तम आहे. अनेकदा भाषणांतही त्याचा प्रत्यय येतो.आज प्रभादेवी दही काला उत्सवाचं निमंत्रण द्यायला आलेल्या मंडळाच्या सदस्यांनीही हा अनुभव घेतला.१५ ऑगस्ट रोजी कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील कत्तलखाने बंद ठेवण्याबरोबरच मटण-मांस विक्रीवर बंदी घालण्याचा निर्णय कल्याण-डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाने घेतला आहे. या निर्णयावर आता मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी आपली भूमिका व्यक्त केली आहे. माध्यमांशी बोलत असताना त्यांना हा प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर त्यांनी म्हटले की, स्वातंत्र्यदिनाच्या दिवशीच लोकांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले जात आहे असं राज ठाकरे म्हणाले. राज ठाकरे यांना यासंबंधीचा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता ते म्हणाले, “आमच्या लोकांना हे सर्व चालू ठेवण्यास सांगितले आहे. महानगरपालिकेला या गोष्टीचे अधिकार नाहीत.

कुणी काय खावे आणि कुणी काय खाऊ नये? हे ठरविण्याचे अधिकार सरकार आणि महानगरपालिकेचे नाहीत.” एका बाजूला स्वातंत्र्यदिन साजरा करायचा आणि दुसऱ्या बाजूला लोकांना खायचे स्वातंत्र्य नाही?, असा संतप्त सवालही त्यांनी उपस्थित केला. स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी कशावर तरी बंदी आणणे हाच मोठा विरोधाभास आहे. स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन हे दोन दिवस आपल्यासाठी महत्त्वाचे आहेत. या दोन दिवशी तुम्ही बंदी कशी काय आणू शकता? कुणाचा काय धर्म, कुणाचे काय सण आहेत? यानुसार कुणी काय खावे, हे सरकारने सांगण्याची गरज नाही.” असं राज ठाकरे म्हणाले. मात्र त्यानंतर जेव्हा दही हंडी मंडळाचे लोक त्यांच्याकडे निमंत्रण घेऊन गेले तेव्हा मी फक्त मटण हंडीचं निमंत्रण स्वीकारतो असं राज ठाकरे मिश्किलपणे म्हणाले.प्रभादेवी दही काला उत्सवाचं निमंत्रण द्यायला त्या मंडळाचे सदस्य गेले होते. तेव्हा राज ठाकरे म्हणाले, “हंडीचं आमंत्रण? मी फक्त मटण हंडीचं आमंत्रण स्वीकारतो बरं का.” ज्यानंतर उपस्थितांमध्ये हशा पिकला. दरम्यान महापालिकांनी १५ ऑगस्टला मांस विक्रीची भूमिका घेतली आहे त्यावरही राज ठाकरेंनी प्रतिक्रिया दिली. राज ठाकरे यांचं राजकारणातलं टायमिंग जसं चांगलं आहे तशीच त्यांची विनोदबुद्धीही उत्तम आहे. अनेकदा भाषणांतही त्याचा प्रत्यय येतो.आज प्रभादेवी दही काला उत्सवाचं निमंत्रण द्यायला आलेल्या मंडळाच्या सदस्यांनीही हा अनुभव घेतला.१५ ऑगस्ट रोजी कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील कत्तलखाने बंद ठेवण्याबरोबरच मटण-मांस विक्रीवर बंदी घालण्याचा निर्णय कल्याण-डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाने घेतला आहे. या निर्णयावर आता मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी आपली भूमिका व्यक्त केली आहे.

# थोरात विधानसभेत नसणे ही महाराष्ट्राची खंत

## महाराष्ट्रात आता बदलाची प्रक्रिया सुरु झाली : खासदार संजय राऊत

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**सहकार, ग्रामीण विकास, दूध व्यवसाय, आर्थिक समृद्धी, कृषी, शिक्षण आणि निळवंडे धरणाचे पाणी देऊन या भागामध्ये समृद्धी निर्माण करण्याचे काम माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले. या नेतृत्वाने तालुक्याला प्रथम क्रमांकाचे बनवताना राज्याच्या विकासात मोठे योगदान दिले. त्यांच्यासारखा मोहरा विधानसभेत नसणे ही महाराष्ट्राची सगळ्यात मोठी खंत असल्याचे प्रतिपादन शिवसेनेचे (ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी केले.**



## धरण आणि कालवे पूर्ण केले

माजी मंत्री थोरात म्हणाले, डिग्रसचे देवस्थान श्रद्धास्थान आहे. येथे शेकडो बकऱ्यांची बळी देण्याची परंपरा होती. परंतु, संत नारायण गिरी महाराज यांचा सप्ताह या ठिकाणी झाला आणि ही प्रथा बंद झाली. मी शिक्षणमंत्री असताना या परिसरामध्ये शाळा सुरू केली आणि त्या माध्यमातून हजारो विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊन काम करत आहेत. निळवंडे धरण आणि कालवे आपण पूर्ण केले.

डिग्रस येथे संत बुवाजी बाबा यांच्या आध्यात्मिक सोहळा यात्रेत खासदार राऊत बोलत होते. माजी मंत्री बाळासाहेब थोरात, रणजीतसिंह देशमुख, महंत बुवाजीबाबा पुणेकर, उमाजीबाबा पुणेकर, बबन सांगळे, डॉ. जयश्री थोरात, शंकर खेमनर, शिवसेनेचे अमर कतारी, संजय फड, पप्पू कानकाटे आदी उपस्थित होते. शिक्षण देऊन या भागाला राज्यात प्रथम क्रमांकाचे बनवले. या विभागाच्या विकासात आणि राज्याच्या विकासात काम करणाऱ्या या नेतृत्वाचा पराभव कुणालाही मान्य होणारा नाही. ते विधानसभेत नसणे ही महाराष्ट्राची मोठी खंत आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळामध्ये अत्यंत चांगले काम राज्य सरकारने केले. करोना संकटात महाराष्ट्राला वाचवले. मात्र, खोटेपणा आणि गद्दारी करून सरकार पाडले गेले.महाराष्ट्रात आता बदलाची प्रक्रिया सुरू झाली असून, आगामी काळामध्ये पुन्हा महाविकास आघाडीचे सरकार येणार असून, महाराष्ट्र धर्म वाढवण्यासाठी थोरात यांच्यासारख्या बुलंद नेतृत्वाच्या पाठीशी उभे रहा, असे आवाहन करताना जनतेचे काम करणारे हे नेतृत्व असून, पैसे वाटणारे येतात आणि जातात.


## संघर्षावर तोडगा

## पुतिन यांच्या भेटीपूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांचं मोठं विधान

# रशिया चर्चेसाठी का तयार झाला?

### ट्रम्प आणि पुतिन यांची होणार भेट?





।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रशिया आणि युक्रेनमध्ये दोन वर्षांपासून संघर्ष सुरू आहे. रशिया सातत्याने युक्रेनच्या विविध शहरांवर हल्ले करत आहे, तर त्या हल्ल्याला युक्रेनही जशास तसं उत्तर देत आहे. या दोन्ही देशातील संघर्षाचे परिणाम दुसऱ्या काही देशांवर देखील होत आहेत. मात्र, रशिया-युक्रेन संघर्ष थांबवण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे गेल्या काही दिवसांपासून मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करत आहेत. पण अद्याप हा संघर्ष थांबवण्यास ट्रम्प यांना यश आलेलं नाही.**

दरम्यान, आता रशिया-युक्रेन संघर्षावर तोडगा काढण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प हे स्वत: व्लादिमीर पुतिन यांची १५ ऑगस्ट २०२५ रोजी अलास्कामध्ये भेट घेणार आहेत. त्यामुळे या भेटीत कोणता मोठा निर्णय होतो? रशिया-युक्रेन संघर्षावर काय तोडगा निघणार? याकडे अवघ्या जगाचं लक्ष लागलेलं आहे. पण व्लादिमीर पुतिन यांची भेट होण्यापूर्वीच ट्रम्प यांनी एक मोठं विधान केलं आहे. अमेरिकेने भारतावर लादलेल्या ५० टक्के टॅरिफमुळेच रशिया युक्रेनबरोबरच्या संघर्षावरील चर्चेसाठी प्रवृत्त झाला असल्याचं मत ट्रम्प यांनी व्यक्त केलं आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.व्लादिमीर पुतिन यांच्याबरोबरील चर्चा चांगली झाली तर ते (ट्रम्प) युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांना फोन करतील आणि आम्ही जिथे भेटणार आहोत, तिथे त्यांना घेऊन जातील असं ट्रम्प यांनी सांगितलं आहे.

दरम्यान, पुतिन यांच्या भेटीपूर्वी ट्रम्प म्हणाले की, "भारतावर लादलेल्या आयातशुल्कामुळे (टॅरिफ) रशियाकडून तेल खरेदी करण्यापासून त्यांना रोखलं गेलं आणि मॉस्कोला वाटाघाटीच्या टेबलावर आणण्यात त्यांनी (भारताने) भूमिका बजावली असावी. मला वाटतं की आता रशियाला खात्री पटली असेल की ते करार करणार आहेत आणि मला वाटतं की ते करतील. पण याबाबत आता काय होतंय ते लवकरच कळेल", असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं.दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ निर्बंधांच्या धमक्यांमुळे पुतिन यांच्या भेटीच्या निर्णयावर परिणाम झाला का?

असा प्रश्न विचारण्यात आला असता ट्रम्प यांनी म्हटलं की, "प्रत्येक गोष्टीचा परिणाम होतो. तसंच भारताविरुद्धच्या टॅरिफमुळे रशियाकडून तेल खरेदी करण्यापासून त्यांना रोखलं गेलं. नक्कीच. जेव्हा तुम्ही तुमचा दुसरा सर्वात मोठा ग्राहक गमावता, तेव्हा मला वाटतं की त्यामुळे कदाचित ही एक महत्वाची भूमिका राहिली असेल", असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटल्याचं द गार्डियनने म्हटलं आहे.रशिया आणि युक्रेनमध्ये सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे मध्यस्थी करत असून रशिया-युक्रेन संघर्ष थांबवण्यासाठी पुतिन यांची ते भेट घेणार आहेत. १५ ऑगस्ट २०२५ रोजी डोनाल्ड ट्रम्प आणि पुतिन यांची भेट होणार आहे. या भेटीत रशिया-युक्रेन युद्धबंदीसाठी तोडगा काढण्याच्या संदर्भात चर्चा होणार आहे. पुतिन आणि ट्रम्प यां ही भेट अलास्कामध्ये होणार आहे.दरम्यान, आता रशिया-युक्रेन संघर्षावर तोडगा काढण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प हे स्वत: व्लादिमीर पुतिन यांची १५ ऑगस्ट २०२५ रोजी अलास्कामध्ये भेट घेणार आहेत. त्यामुळे या भेटीत कोणता मोठा निर्णय होतो? रशिया-युक्रेन संघर्षावर काय तोडगा निघणार? याकडे अवघ्या जगाचं लक्ष लागलेलं आहे. पण व्लादिमीर पुतिन यांची भेट होण्यापूर्वीच ट्रम्प यांनी एक मोठं विधान केलं आहे. अमेरिकेने भारतावर लादलेल्या ५० टक्के टॅरिफमुळेच रशिया युक्रेनबरोबरच्या संघर्षावरील चर्चेसाठी प्रवृत्त झाला असल्याचं मत ट्रम्प यांनी व्यक्त केलं आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.व्लादिमीर पुतिन यांच्याबरोबरील चर्चा चांगली झाली तर ते (ट्रम्प) युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांना फोन करतील आणि आम्ही जिथे भेटणार आहोत, तिथे त्यांना घेऊन जातील असं ट्रम्प यांनी सांगितलं आहे. वाटाघाटीच्या टेबलावर आणण्यात त्यांनी (भारताने) भूमिका बजावली असावी.

### 'प्रत्येक गोष्टीचा परिणाम होतो'

डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ निर्बंधांच्या धमक्यांमुळे पुतिन यांच्या भेटीच्या निर्णयावर परिणाम झाला का? असा प्रश्न विचारण्यात आला असता ट्रम्प यांनी म्हटलं की,जेव्हा तुम्ही तुमचा दुसरा सर्वात मोठा ग्राहक गमावता, तेव्हा मला वाटतं की त्यामुळे कदाचित ही एक महत्वाची भूमिका राहिली असेल", असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटल्याचं द गार्डियनने म्हटलं आहे.

# अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे समस्या!

## भटक्या कुत्र्यांसंबंधी सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण



।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी प्रदेशातील (एनसीआर) भटक्या कुत्र्यांशी संबंधित सर्व समस्या ही स्थानिक अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेचा परिणाम आहे असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी नोंदवले. या अधिकाऱ्यांनी काहीही केले नाही असे मत न्या. विक्रम नाथ, न्या. संदीप मेहता आणि न्या. एन व्ही अंजारिया यांच्या खंडपीठाने व्यक्त केले.**

मात्र, त्यांनी न्यायालयाच्या दोन सदस्यीय खंडपीठाने सोमवारी दिलेल्या आदेशाला स्थगिती दिली नाही.न्या. जे बी पारडीवाला आणि न्या. आर महादेवन यांच्या खंडपीठाने ११ ऑगस्टला दिलेल्या निकालामध्ये दिल्ली व 'एनसीआर'मधील सर्व भटक्या कुत्र्यांची रवानगी आश्रय केंद्रांमध्ये करण्याचे आदेश प्रशासनाला दिले होते. पाच हजार भटक्या कुत्र्यांसाठी आश्रय केंद्रे तयार करून या आदेशाची अंमलबजावणी सुरू करायला दोन सदस्यीय खंडपीठाने सांगितले होते. या निर्णयाविरोधात प्राणिप्रेमींसह काही राजकीय नेत्यांनीही नाराजी व्यक्त केली होती. सर्वोच्च न्यायालयाने त्याची दखल घेऊन गठित केलेल्या त्रिसदस्यीय खंडपीठासमोर गुरुवारी सुनावणी झाली.स्वयंसेवी संस्था प्राणीहक्कासाठी बरेच बोलतात, पण नक्की काय करायचे ते त्यांना माहीत नसते. त्यांनी प्राणी जन्मनियंत्रण नियमांच्या अंमलबजावणीसाठी त्यांनी आधीच न्यायालयात यायला हवे होते," असे मत न्यायालयाने नोंदवले. दिल्ली सरकारची बाजू मांडणारे महान्यायअभिकर्ता तुषार मेहता यांनी देशभरातील कुत्र्यांनी चावा घेतलेल्या आकडेवारीचा दाखला दिला. २०२४मध्ये देशभरात कुत्री चावण्याच्या ३७.१५ लाख घटना घडल्याचे त्यांनी सांगितले.

### अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेचा परिणाम

भटक्या कुत्र्यांची समस्या सोडवण्याची गरज आहे, त्यावरून वाद घालण्याची नाही," असे ते म्हणाले. ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी ११ ऑगस्टच्या आदेशातील काही निर्देशांना स्थगिती देण्याची विनंती केली.दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी प्रदेशातील (एनसीआर) भटक्या कुत्र्यांशी संबंधित सर्व समस्या ही स्थानिक अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेचा परिणाम आहे.

# अभिनेत्री आरती छाब्रियाने आनंदाची बातमी दिली

'राजा भैय्या', 'आवारा पागल दिवाना', 'तुमसे अच्छा कौन है', 'मिलेंगे मिलेंगे' अशा चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकणारी अभिनेत्री आरती छाब्रियाने आनंदाची बातमी दिली आहे. आरती आई झाली आहे, तिने एका महिन्याआधी गोंडस बाळाला जन्म दिला आहे. आरती ४१ व्या वर्षी आई झाली आहे. आरतीने ४ मार्च रोजी मुलाला जन्म दिला असून त्याचं नावही सांगितलं आहे. आरतीच्या पतीचं नाव विशारद बीडासी असून तो चार्टर्ड अकाउंटंट आहे. आरतीने मुलाचं नाव युवान ठेवलं आहे. तिने ती गरोदर असल्याची बातमी का लपवून ठेवली होती, याबद्दल 'हिंदुस्थान टाइम्स' शी बोलताना सांगितलं. "मला वाटत होतं की जेव्हा मला बाळाबद्दल सांगावसं वाटेल तेव्हाच मी सांगेन. आता मला सांगावसं वाटतंय. कारण माझ्या बाळाचा जन्म होऊन एक महिना झाला आहे," असं ती म्हणाली. तसेच सुरुवातीचे काही महिने आपण कपड्यांमुळे प्रेग्नेन्सी लपवली, असं तिने सांगितलं.आरती आणि तिच्या पतीने २०१९ मध्ये अरेंज मॅरेज केलं होतं. लग्नानंतर ते दोघे ऑस्ट्रेलियाला गेले आणि करोना आल्यामुळे तिथेच अडकले. "दूर राहणं तणावपूर्ण होतं, त्या परिस्थिती तुम्ही वेगवेगळ्या भावनांमधून जात असता त्यामुळे गर्भधारणा करू शकत नाही. मी नवीन ठिकाण आणि नवीन लोकांशी जुळवून घेण्यासाठी धडपडत होते, माझ्या शरीरातही खूप बदल होत होते," असं ती म्हणाली. तसेच ४१ व्या वर्षी बाळाला जन्म देणं हे विशीत किंवा तिशीत जन्म देण्याइतकं सोपं नाही, असंही तिने नमूद केलं."आधी माझा गर्भपात झाला होता, त्यामुळे यावेळी मी गर्भधारणेबद्दल न सांगायचं ठरवलं. मला उपचार घ्यावे लागले, तेव्हा मी गरोदर राहिले. बरेच लोक बोलतात ही अभिनेत्री आहे, हिच्याकडे पैसा आहे, त्यामुळे काही अडचण नाही. पण असं नसतं. हे उपचार आरोग्यावर परिणाम करतात. माझं वजन विचित्र पद्धतीने वाढलं, मला औषधांचे दुष्परिणाम जाणवत होते. औषधं घेऊनही मी गरोदर झाले नाही, शेवटी मी सर्व आशा सोडून दिल्या होत्या. पण नंतर मी गरोदर राहिले," असं आरती म्हणाली.'राजा भैय्या', 'आवारा पागल दिवाना', 'तुमसे अच्छा कौन है', 'मिलेंगे मिलेंगे' अशा चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकणारी अभिनेत्री आरती छाब्रियाने आनंदाची बातमी दिली आहे.

## माधुरी दीक्षितच्या मनमोहक अदा

९० च्या दशकात माधुरी दीक्षितने आपल्या अभिनयासह दमदार नृत्याने सगळ्यांवर मोहिनी घातली होती. या मराठमोळ्या अभिनेत्रीने बॉलीवूडमध्ये स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण करून चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवलं. तिला बॉलीवूडची 'धकधक गर्ल' म्हणून सुद्धा ओळखलं जातं. सध्या माधुरीने इन्स्टाग्रामवर शेअर केलेला असाच एक व्हिडीओ चर्चेत आला आहे. इन्स्टाग्राम रील्सवर अनेक गाणी व्हायरल होत असतात. सध्या आशा भोसले यांचं १९८३ मध्ये प्रदर्शित झालेलं "सलोना सा सजन है...और मैं हू" या गाण्याची नेटकऱ्यांना भुरळ पडली आहे. अगदी माधुरीला सुद्धा या गाण्यावर थिरकण्याचा मोह आवरला नाही. अभिनेत्रीने नुकताच या गाण्यावर ब्लॅक अँड व्हाइट व्हिडीओ शेअर केला आहे.आशा भोसलेंच्या या जवळपास ४० वर्षे जुन्या गाण्यावर अभिनेत्रीचा मनमोहक अंदाज पाहायला मिळत आहे. माधुरीने या व्हिडीओमध्ये इंडो-वेस्टर्न लूक करत साडी नेसल्याचं पाहायला मिळत आहे. तिच्या अदाकारीची केवळ नेटकऱ्यांनाच नव्हे तर मराठी अभिनेत्रींना देखील भुरळ पडली आहे.माधुरीच्या व्हिडीओवर क्रांती रेडकरने "ओह माय गॉड तू खरंच बेस्ट आहेस" अशी कमेंट करत लक्ष वेधून घेतलं आहे. तर अमृता खानविलकरने या व्हिडीओवर कमेंट करत "उफ...ग्रेस" असं म्हटलं आहे.

## कुठे आहे मालिनी शर्मा?



डिनो मोरिया, बिपाशा बासूची या भयपटातील रोमँटिक गाणी चर्चा झाली जिचा मुख्य भूमिका असलेला 'राज' चित्रपट तुम्हाला आठवत असेल. खूप गाजली होती. डिनो आणि बिपाशा यांच्या केमिस्ट्रीची खूप होती. या सिनेमात या दोघांव्यतिरिक्त आणखी एक अभिनेत्री होती, 'मैं तुम्हें बर्बाद कर दूंगी' हा डायलॉग खूप लोकप्रिय झाला होता. ती अभिनेत्री कोण आहे व आता कुठे आहे, याबाबत जाणून घेऊयात. 'राज'मध्ये डिनो मोरिया आणि बिपाशा बसू यांच्याशिवाय अभिनेत्री मालिनी शर्मा होती. तिने भुताची भूमिका केली होती. या चित्रपटात तिची दमदार भूमिका होती. सिनेमात डिनो व मालिनीचं अफेअर दाखवण्यात आलं होतं. दोघांमध्ये खूप इंटिमेट आणि रोमँटिक सीन शूट करण्यात आले होते. विवाहित डिनो मालिनीशी लग्न करण्यास नकार देतो आणि ती गोळी मारून आत्महत्या करते. मग ती भुताच्या रुपात त्याला व बिपाशाला त्रास देते अशी चित्रपटाची कथा होती. या चित्रपटानंतर तिच्या अभिनयाची व सौंदर्याचीही खूप चर्चा झाली.मालिनीने आपल्या करिअरची सुरुवात मॉडेलिंगपासून केली होती. तिने करिअरमध्ये अनेक टीव्ही शो आणि चित्रपटांमध्ये काम केलं. याशिवाय ती बॉम्बे वायकिंगच्या 'क्या सूरत है' या गाण्यातही दिसली होती. इतकंच नाही तर अभिनेत्रीने मिका सिंगच्या 'सावन में लग गई आग' या गाण्यात काम केलं होतं.मालिनी शर्माच्या वैयक्तिक आयुष्याविषयी बोलायचं झाल्यास तिने प्रियांशू चॅटर्जीशी लग्न केलं, पण त्यांचं नातं फार काळ टिकलं नाही. चार वर्षांनंतर त्यांचा घटस्फोट झाला. आता मालिनी शर्मा कुठे आणि काय करते याबद्दल माहिती उपलब्ध नाही.डिनो मोरिया, बिपाशा बासूची मुख्य भूमिका असलेला 'राज' चित्रपट तुम्हाला आठवत असेल. या भयपटातील रोमँटिक गाणी खूप गाजली होती. डिनो आणि बिपाशा यांच्या केमिस्ट्रीची खूप चर्चा झाली होती. या सिनेमात या दोघांव्यतिरिक्त आणखी एक अभिनेत्री होती, जिचा 'मैं तुम्हें बर्बाद कर दूंगी' हा डायलॉग खूप लोकप्रिय झाला होता. ती अभिनेत्री कोण आहे व आता कुठे आहे, याबाबत जाणून घेऊयात. 'राज'मध्ये डिनो मोरिया आणि बिपाशा बसू यांच्याशिवाय अभिनेत्री मालिनी शर्मा होती. तिने भुताची भूमिका केली होती. या चित्रपटात तिची दमदार भूमिका होती. सिनेमात डिनो व मालिनीचं अफेअर दाखवण्यात आलं होतं. दोघांमध्ये खूप इंटिमेट आणि रोमँटिक सीन शूट करण्यात आले होते.

## जॅकी श्रॉफ यांचा व्हिडीओ होतोय तुफान व्हायरल

आपल्या स्पष्टवक्तेपणामुळे, वेगळ्या अंदाजामुळे, स्टाइलमुळे ज्येष्ठ अभिनेते जॅकी श्रॉफ नेहमी चर्चेत असतात. त्यांची स्टाइल चाहत्यांना खूप आवडते. सध्या जॅकी श्रॉफ यांचा एक व्हिडीओ तुफान व्हायरल होतं आहे. या व्हिडीओमधील जॅकी श्रॉफ यांची कृती पाहून नेटकरी भडकले आहेत. त्यांना ट्रोल करत आहेत. जॅकी श्रॉफ यांचा व्हायरल व्हिडीओ 'इंस्टंट बॉलीवूड' या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे. एका कार्यक्रमासाठी जॅकी श्रॉफ दोन झाडं घेऊन जात होते. तितक्यात त्यांचे चाहते फोटो घेण्यासाठी त्यांच्याकडे धावले. जॅकी श्रॉफ यांनी सगळ्या चाहत्यांबरोबर फोटो काढले. पण यावेळी त्यांनी चाहत्यांना दिलेल्या वागणुकीने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं.या व्हिडीओत, जॅकी श्रॉफ फोटो काढण्यात आलेल्या चाहत्याला डोक्यात मारताना दिसत आहेत. तसेच इतरांना दम देताना पाहायला मिळत आहे. जॅकी श्रॉफ यांनी चाहत्यांना दिलेल्या या वागणुकीवरून नेटकरी भडकले आहेत.एका नेटकऱ्याने लिहिलं आहे, "त्याला मारलं का? वेडेत आहेत का?" तर दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, "हे खूप चुकीचं आहे. तुम्ही कोणालाही मारू शकत नाही. चाहते तुमचे मित्र किंवा नातेवाईक नाहीत, ज्यांच्याबरोबर तुम्ही मस्ती कराल." तसेच तिसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, "हात लावला तर काय झालं? एवढा गर्व नाही पाहिजे." चौथ्या नेटकऱ्याने लिहिलं, "हे चुकीचं आहे. सामान्य माणसांना हे आदर देत नाहीत."सध्या जॅकी श्रॉफ यांच्या या व्हिडीओची चांगलीच चर्चा सुरू आहे. पण काही नेटकरी त्यांना आलेले जॅकी श्रॉफ यांचे चांगले अनुभव शेअर करत आहेत.आपल्या स्पष्टवक्तेपणामुळे, वेगळ्या अंदाजामुळे, स्टाइलमुळे ज्येष्ठ अभिनेते जॅकी श्रॉफ नेहमी चर्चेत असतात. त्यांची स्टाइल चाहत्यांना खूप आवडते. सध्या जॅकी श्रॉफ यांचा एक व्हिडीओ तुफान व्हायरल होतं आहे. या व्हिडीओमधील जॅकी श्रॉफ यांची कृती पाहून नेटकरी भडकले आहेत. त्यांना ट्रोल करत आहेत. जॅकी श्रॉफ यांचा व्हायरल व्हिडीओ 'इंस्टंट बॉलीवूड' या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे. एका कार्यक्रमासाठी जॅकी श्रॉफ दोन झाडं घेऊन जात होते. तितक्यात त्यांचे चाहते फोटो घेण्यासाठी त्यांच्याकडे धावले. जॅकी श्रॉफ यांनी सगळ्या चाहत्यांबरोबर

## रकुल प्रित सिंहने केली खास पोस्ट



लातूर ग्रामीणचे आमदार धिरज देशमुख यांचा आज वाढदिवस आहे. वाढदिवसानिमित्त त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. अभिनेत्री रकुल प्रित सिंगनेही धिरज यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. तिने तिच्या व जॅकीच्या लग्नसोहळ्यातील एक खास फोटो शेअर करत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. रितेश देशमुखचे भाऊ धिरज यांची पत्नी दिपशिखा ही रकुल प्रितची सख्खी नणंद आहे. रकुल व जॅकी यांचं फेब्रुवारी महिन्यात गोव्यात लग्न झालं. लग्नाच्या कार्यक्रमातील एक फोटो रकुलने शेअर केला आहे. या फोटोत रकुल व धिरज देशमुख डान्स करताना दिसत आहेत. 'वाढदिवसाच्या शुभेच्छा, येणारं वर्ष आनंदाचं जावो आणि या वर्षात तुम्हाला हवं ते सर्व मिळो,' असं रकुलने या फोटोत धिरज देशमुखांना टॅग करत लिहिलं.रकुल व जॅकीचं लग्न २१ फेब्रुवारी रोजी गोव्यात झालं. मेहुण्याच्या लग्नासाठी धिरज देशमुख गोव्याला गेले होते. त्यांची पत्नी दिपशिखा व मुलं सर्वजण या लग्नासाठी काही दिवस गोव्यात होते.

दमदार कामगिरी

## भुवनेश्वरने रोहितच्या नेतृत्वातील यशामागचं गुपित सांगितलं

# म्हणून रोहित इतका यशस्वी आहे!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघाचा वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमार हा स्विंग गोलंदाजीचा बादशाह म्हणून ओळखला जातो. एमएस धोनीच्या नेतृत्वाखाली पदार्पण करणाऱ्या भुवनेश्वर कुमारकडे विराट कोहली आणि रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली खेळण्याचा देखील अनुभव आहे. भारतात असो की परदेशात त्याने नेहमीच भारतीय संघासाठी दमदार कामगिरी केली आहे. मात्र, गेल्या ३ वर्षांपासून तो भारतीय संघातून बाहेर आहे. २०२२ मध्ये तो शेवटचा सामना खेळताना दिसून आला होता. आता एका मुलाखतीत त्याने रोहित शर्माचं तोंडभरून कौतुक केलं आहे.**

भुवनेश्वर कुमार आंतराराष्ट्रीय क्रिकेटमधून बाहेर आहे. पण लवकरच तो युपी टी -२० लीग स्पर्धेत लखनऊ फाल्कन्स संघाकडून खेळताना दिसेल. या स्पर्धेला येत्या १७ ऑगस्टपासून सुरुवात होणार आहे. या स्पर्धेला सुरुवात होण्यापूर्वी

### रोहित शर्माचं तोंडभरून कौतुक



भुवनेश्वर कुमारने रोहित शर्माच्या नेतृत्वाबद्दल मोठा खुलासा केला आहे.भारताचा वनडे संघाचा कर्णधार रोहित शर्माने टी -२० आणि कसोटी क्रिकेटला रामराम केलं आहे. तो आगामी २०२७ चा वनडे वर्ल्डकप खेळणार की नाही, अशी चर्चा सुरू आहे. रोहित शर्माचं कौतुक करताना भुवनेश्वर कुमार म्हणाला,“ रोहित शर्मा हा परिपक्व कर्णधार आहे. ज्याला आपल्या खेळाडूंकडून चांगली कामगिरी कशी करून घ्यायची हे चांगलं माहित आहे. संघातील खेळाडूंचा मजबूत पक्ष त्याला चांगलाच माहित आहे आणि त्याचा योग्य वापरही तो करून घेतो. तो माझ्याशी एका सामान्य मित्रासारखाच बोलतो.”फलंदाजीत हिट असलेल्या रोहित शर्माने नेतृत्वातही दमदार कामगिरी केली आहे. रोहितने १४२ सामन्यांमध्ये भारतीय संघाचं नेतृत्व केलं आहे. यादरम्यान त्याने १०३ सामन्यांमध्ये भारतीय संघाला विजय मिळवून दिला आहे. तर ३३ सामने गमावले आहेत. कसोटी क्रिकेटमध्ये रोहितने २४ सामन्यांमध्ये भारतीय संघाचं नेतृत्व केलं आहे. यादरम्यान १२ सामन्यात भारतीय संघाला विजय मिळवता आला आहे. तर ९ सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला आहे. टी -२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील ६२ सामन्यांमध्ये त्याने भारतीय संघाचं नेतृत्व केलं आहे. यादरम्यान ४९ सामन्यात भारतीय संघाने विजयाची नोंद केली आहे.भुवनेश्वर

### स्विंग गोलंदाजीचा बादशाह

टी -२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील ६२ सामन्यांमध्ये त्याने भारतीय संघाचं नेतृत्व केलं आहे. यादरम्यान ४९ सामन्यात भारतीय संघाने विजयाची नोंद केली आहे.कुमार हा स्विंग गोलंदाजीचा बादशाह म्हणून ओळखला जातो. एमएस धोनीच्या नेतृत्वाखाली पदार्पण करणाऱ्या भुवनेश्वर कुमारकडे विराट कोहली आणि रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली खेळण्याचा देखील अनुभव आहे.

कुमार आंतराराष्ट्रीय क्रिकेटमधून बाहेर आहे. पण लवकरच तो युपी टी -२० लीग स्पर्धेत लखनऊ फाल्कन्स संघाकडून खेळताना दिसेल. या स्पर्धेला येत्या १७ ऑगस्टपासून सुरुवात होणार आहे. या स्पर्धेला सुरुवात होण्यापूर्वी भुवनेश्वर कुमारने रोहित शर्माच्या नेतृत्वाबद्दल मोठा खुलासा केला आहे.भारताचा वनडे संघाचा कर्णधार रोहित शर्माने टी -२० आणि कसोटी क्रिकेटला रामराम केलं आहे. तो आगामी २०२७ चा वनडे वर्ल्डकप खेळणार की नाही, अशी चर्चा सुरू आहे. रोहित शर्माचं कौतुक करताना भुवनेश्वर कुमार म्हणाला,“ रोहित शर्मा हा परिपक्व कर्णधार आहे. ज्याला आपल्या खेळाडूंकडून चांगली कामगिरी कशी करून घ्यायची हे चांगलं माहित आहे. संघातील खेळाडूंचा मजबूत पक्ष त्याला चांगलाच माहित आहे आणि त्याचा योग्य वापरही तो करून घेतो. तो माझ्याशी एका सामान्य मित्रासारखाच बोलतो.”फलंदाजीत हिट असलेल्या रोहित शर्माने नेतृत्वातही दमदार कामगिरी केली आहे. रोहितने १४२ सामन्यांमध्ये भारतीय संघाचं नेतृत्व केलं आहे. यादरम्यान त्याने १०३ सामन्यांमध्ये भारतीय संघाला विजय मिळवून दिला आहे. तर ३३ सामने गमावले आहेत. कसोटी क्रिकेटमध्ये रोहितने २४ सामन्यांमध्ये भारतीय संघाचं नेतृत्व केलं आहे. यादरम्यान १२ सामन्यात भारतीय संघाला विजय मिळवता आला आहे.

# शुबमन गिलचं टी-२० संघात पुनरागमन

## आशियामध्ये कोण असणार भारताचा कर्णधार? मोठी अपडेट समोर

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**इंग्लंड दौऱ्यानंतर भारतीय संघ सध्या विश्रांती घेत आहे. यानंतर टीम इंडिया आशिया चषक २०२५ साठी सज्ज होणार आहे. येत्या सप्टेंबर महिन्यात युएईमध्ये आशिया चषक खेळवला जाणार आहे. दरम्यान आता या स्पर्धेसाठी शुबमन गिलचा फक्त टी-२० संघातच नाही तर नेतृत्त्व गटात समावेश होणार असल्याचे म्हटले जात आहे.**

शुबमन गिल भारताच्या मागील बांगलादेश, दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंड या तीन





टी-२० मालिकांमध्ये संघाचा भाग नव्हता. पण तरीही आता आशिया चषकासाठी टी-२० संघात फक्त फलंदाज म्हणून नाहीतर कर्णधार म्हणून गिलचं पुनरागमन होणार असल्याची माहिती समोर येत आहे. निवड समितीने गिलला भारताच्या टी-२० संघात परत घेण्याचा गांभीर्याने विचार करण्यामागे दोन कारणं आहेत. पहिलं म्हणजे, गेल्या वर्षी जूनमध्ये टीम इंडियाने टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर कधीच पूर्ण ताकदीनिशी निश्चित टी-२० संघ निवडलेला नाही. गिल त्या संघाचा भाग नव्हता पण

### सर्व फॉरमॅटसाठी एकच कर्णधार

निवडकर्ते आणि सर्व निर्णय घेणारे व्यक्ती सर्व फॉरमॅटसाठी एकच कर्णधार असावा या बाजूने आहेत. सूर्यकुमार यादवने फलंदाज म्हणून किंवा टी-२० मध्ये कर्णधार म्हणून सातत्याने चांगलीच कामगिरी केली आहे, त्यामुळे त्याच्या जागी बदली कर्णधाराची नियुक्ती करण्याचे कोणतेही कारण नसणार आहे. परंतु गिलचा आशिया चषकसाठी नेतृत्त्व गटात समावेश करण्यात येणार असल्याचं निश्चित आहे.

वर्ल्डकप विजयानंतर लगेचच झिम्बाब्वे दौऱ्यावर गेलेल्या युवा संघाचा कर्णधार म्हणून त्याची निवड करण्यात आली. श्रीलंकेविरूद्ध टी-२० मालिकेत तो भारताचा उपकर्णधारही होता परंतु इतर फॉरमॅटचा प्रामुख्याने कसोटी क्रिकेटची जबाबदारी वाढल्याने निवडकर्त्यांनी गिलला टी-२० फॉरमॅटपासून लांब ठेवण्याचा निर्णय घेतला.गिलच्या अनुपस्थितीत गेल्या ३ टी-२० मालिकांमध्ये,ालिकेत तुलनेने अननुभवी संघाचा कर्णधार म्हणून गिलने केलेली कामगिरी पाहता, त्याला इतर कोणत्याही फॉरमॅटपासून दूर ठेवणं कठीण जाणार होतेअसणार आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। शुक्रवार ।

। दि. 15 ऑगस्ट 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### शिक्षण विश्व: श्रीकृष्ण जन्माष्टमीचा पवित्र उत्सव मोठ्या उत्साहात

# गोविंदा रे गोपालाच्या गजरात शाळेत फुलले नंदनवन!"

## मास्टर माईंड ग्लोबल स्कूल अँण्ड ज्युनिअर कॉलेजमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी साजरी




। प्रतिनिधी ।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**मास्टर माईंड ग्लोबल स्कूल अँण्ड ज्युनिअर कॉलेजमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमीचा पवित्र उत्सव मोठ्या उत्साहात, आनंदात व भक्तिभावाने साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे संपूर्ण शाळा जणू गोकुळधामच भासत होती. गोविंदा रे गोपालाच्या गजरात शाळेचे जणू नंदनवन झाले होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रदीपा नायर यांच्या हस्ते श्रीकृष्ण पूजनाने झाली. संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारलेला होता. दिली.ॅ**

विद्यार्थ्यांनी पारंपरिक श्रीकृष्ण व राधा यांची वेशभूषा परिधान करून कार्यक्रमात सहभाग घेतला. त्यांच्या वेशभूषेने आणि सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. विशेषतः लहान विद्यार्थ्यांचे रूप पाहून शाळा 'बालगोपाळांनी' गजबजून गेली होती.

कार्यक्रमात विविध नृत्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. लहानग्यांपासून ज्युनिअर कॉलेजपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध भक्तिगीतांवर नृत्य सादर केले. त्यांच्या कलाकौशल्यामुळे शाळेच्या सभागृहात जणू एक नंदनवन फुलले होते. यासोबतच सर्वात आकर्षणाचे केंद्र ठरली ती म्हणजे पारंपरिक दहीहंडी स्पर्धा विद्यार्थ्यांच्या संघांनी मटकी फोडण्यासाठी कौशल्य, एकजूट आणि धैर्य दाखवले. मटकी फोडल्यावर टाळ्यांचा कडकडाट आणि 'गोविंदा आला रे' च्या घोषणेने परिसर दुमदुमून गेला.



प्राचार्या डॉ. प्रदीपा नायर यांनी आपल्या भाषणात श्रीकृष्णाच्या जीवनातील धर्म, प्रेम, ज्ञान आणि कर्म यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावले. याप्रसंगी त्यांनी सांगितले की, "असे उत्सव केवळ सण साजरे करण्यापुरते मर्यादित नसून, विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, परंपरा आणि मूल्यांचे शिक्षण देण्याचे उत्तम माध्यम आहेत."

कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन शाळेतील शिक्षक व सांस्कृतिक समिती यांच्या पुढाकाराने झाले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, शिक्षकांची मेहनत आणि पालकांचा प्रतिसाद यामुळे कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

### निलेश बोराटे यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

# मोशीतील नोकरी महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद!

## 2 हजार 500 हून अधिक युवक-युवतींचा सहभाग

। प्रतिनिधी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट व नूतन ग्रुपच्या पीसीसीओई, पीसीसीओईआर व नूतन अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या अंतिम वर्षातील १,७२२ विद्यार्थ्यांसाठी आतापर्यंत १,५९३ नोकऱ्या मिळाल्या आहेत. येत्या सहा महिन्यात बरेचसे नोकरी मेळावे होणार आहेत अशी माहिती पीसीईटी, नूतनच्या सेंट्रल प्लेसमेंट सेल चे अधिष्ठाता प्रा. डॉ. शितलकुमार रवंदळे यांनी दिली.**



मोशी परिसरातील सामाजिक कार्यकर्ते व युवा नेते निलेश बोराटे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये भव्य नोकरी महोत्सव, वृक्षारोपण, भजनी मंडळ सन्मान, सफाई कर्मचारी सन्मान, अनाथ आश्रमांमध्ये अन्नदान तसेच भव्य रक्तदान शिबीर अशा उपक्रमांचा समावेश होता. आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमांना नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

**नोकरी महोत्सवाला तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

श्री निलेश बोराटे सोशल फाऊंडेशन आणि लक्ष्य फाऊंडेशन, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य नोकरी महोत्सवाचा आज यशस्वी समारोप झाला. या महोत्सवात परिसरातील २,५०० पेक्षा अधिक युवक-युवतींनी सहभाग नोंदवला. विशेष म्हणजे, उपस्थितांपैकी 50-60% उमेदवारांना त्वरित नोकरीची संधी मिळाली तर उर्वरित उमेदवारांना पुढील मुलाखतींसाठी बोलावण्यात येणार आहे.

**नामांकित कंपन्यांचा सहभाग**

महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे परिसरातील आणि बाहेरील अनेक नामांकित कंपन्यांची थेट उपस्थिती. कंपन्यांच्या प्रतिनिधींनी उमेदवारांशी प्रत्यक्ष संवाद साधत त्यांच्या कौशल्यांनुसार रोजगार उपलब्ध करून दिले. त्यामुळे रोजगाराच्या शोधात असलेल्या अनेक तरुणांना करिअरच्या दिशेने पहिले पाऊल टाकण्याची संधी मिळाली.

**समाजोपयोगी उपक्रमांतून सामाजिक बांधिलकीची जाणीव**

नोकरी महोत्सवाबरोबरच निलेश बोराटे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण, सफाई कर्मचारी सन्मान, भजनी मंडळ सन्मान, अनाथाश्रमांमध्ये अन्नदान आणि रक्तदान शिबीर यासारख्या उपक्रमांमधून सामाजिक बांधिलकीची जाणीव प्रकर्षाने दिसून आली. या उपक्रमांना स्थानिक नागरिक, स्वयंसेवक आणि विविध सामाजिक संस्थांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.

**आयोजकांचे आभार प्रदर्शन**

कार्यक्रमाच्या यशस्वीतेबद्दल बोलताना निलेश बोराटे यांनी उपस्थित सर्व युवक-युवती, कंपन्यांचे प्रतिनिधी, नागरिक आणि आयोजक टीमचे मनःपूर्वक आभार मानले. त्यांनी सांगितले की, "रोजगाराची संधी – उज्ज्वल भविष्यासाठी नवा मार्ग या ध्येयाने आयोजित नोकरी महोत्सव हा स्थानिक तरुणाईला रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी एक महत्वाचा टप्पा ठरेल."

# एमआयटी कॉलेजचा १९ वा वर्धापन दिन उत्साहात

## प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन, पुरस्कार वितरण व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

। आळंदी (ता. हवेली) ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता पाचवी) शिष्यवृत्ती परीक्षा व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा (इयत्ता आठवी) अंतिम निकाल आणि शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. शिष्यवृत्तीचा एकूण निकाल २२.०६ टक्के लागला आहे.**



एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचा १९ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९.३० वाजता प्रार्थनेने झाली. सूत्रसंचालन श्रीमती पल्लवी महागावकर यांनी केले. या प्रसंगी स्वागतप्रास्ताविक डॉ. अमोल माने (डीन – स्कूल ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंट) यांनी केले, तर प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. मंगेश भोपळे (डीन – ट्रेनिंग अँड प्लेसमेंट) यांनी करून दिली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते तसेच पाच, दहा आणि पंधरा वर्षांपासून सेवा बजावणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. पुरस्कारप्राप्त कर्मचारी व प्राध्यापकांमध्ये श्रीमती आकांक्षा लांडगे, डॉ. वैशाली खेरडेकर, डॉ. शीतल घोटेकर, श्रीमती अनुपमा अलागन्नवार, डॉ. पद्मावती उंडाले, डॉ. अर्चना आहेर आणि श्रीमती सुमित्रा वीर यांचा समावेश होता. विजेत्यांनी आपल्या भावना व्यक्त करत महाविद्यालयाशी असलेल्या ऋणानुबंधांबाबत गौरवोद्गार काढले. या कार्यक्रमात डॉ. बी. बी. वाफरे (संचालक) यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच प्रा. अनंत चक्रदेव (ग्रुप प्रो-व्होस्ट, एमआयटी ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन्स) यांनी संस्थेच्या यशस्वी वाटचालीवर प्रकाश टाकला. प्रमुख पाहुणे डॉ. पराग काळकर (प्रो-व्हाईस चान्सलर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) यांनी अध्यापन, संशोधन व समाजाप्रती शिक्षकांची भूमिका या विषयांवर मोलाचे विचार मांडले.

### 'शिवतांडव' गीताने कार्यक्रमात रंगत...

प्रा. अक्षदा कुलकर्णी (उपसंचालक – अकॅडमिक्स अँड रिसर्च) यांनी आभारप्रदर्शन करत कार्यक्रमाचा समारोप केला. त्यानंतर पसायदान म्हटले गेले. दुपारी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. प्रा. अर्चना आहेर यांनी स्वागत व सूत्रसंचालन केले. नवीन रुजू झालेल्या शिक्षक व कर्मचाऱ्यांची ओळख करून देण्यात आली. 'शिवतांडव' गीताने सांस्कृतिक सत्राची सुरुवात झाली. नृत्य, नाटिका आणि गायनाच्या बहारदार सादरीकरणाने वातावरण उत्साही झाले. विविध विभागातील प्राध्यापकांनीही आपली कला सादर करत कार्यक्रमात रंग भरले. या आठवणींनी समृद्ध अशा वर्धापन दिनाचा समारोप सायंकाळी ४.३० वाजता झाला.

# व्यक्तीविशेष: डॉ. बाळासाहेब वाफरे यांना 'नोबेल रिसर्च अवॉर्ड'

## शिक्षण विश्व: जागतिक पातळीवर भारतीय गणित संशोधनाची दखल



। पुणे।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आळंदी (देवाची) येथील प्राचार्य व प्रख्यात गणितज्ञ डॉ. बाळासाहेब वाफरे यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव प्राप्त झाला आहे. सायंटिफिक लॉरेल्स या जगप्रसिद्ध वैज्ञानिक संस्थेने त्यांना गणित क्षेत्रातील उल्लेखनीय संशोधन, शैक्षणिक नेतृत्व व उच्च शिक्षण क्षेत्रातील अमूल्य योगदानाबद्दल 'नोबेल रिसर्च अवॉर्ड' प्रदान केला आहे.**




सायंटिफिक लॉरेल्स ही संस्था विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करते. जगभरातील नामांकित वैज्ञानिक, संशोधक व व्यावसायिक या संस्थेचा भाग आहेत. संस्थेचे उद्दिष्ट वैज्ञानिक प्रगतीला गती देणे आणि उत्कृष्टतेची दखल घेणे हे आहे.

डॉ. वाफरे यांचा दांडगा अनुभव डॉ. वाफरे यांना ३२ वर्षांचा अध्यापन व २५ वर्षांचा संशोधनाचा अनुभव असून, विविध नामवंत संस्थांमध्ये त्यांनी महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. सध्या ते एमआयटी आळंदी (दे.) येथे प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी बीसीयूडी अंतर्गत संशोधन प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण केला असून, अणुऊर्जा विभागाच्या अनुदानासह "इंटिग्रल ट्रान्सफॉर्म्स आणि त्यांचे अनुप्रयोग समाविष्ट करणारे स्यूडोडिफरेंशियल टाइप ऑपरेटर" या विषयावर ₹१६.८ लाखांचे संशोधन यशस्वीपणे पार पाडले आहे.

**संशोधन व पुरस्कारांचा ठसा**

डॉ. वाफरे यांनी १३५ हून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन लेख प्रकाशित केले असून, त्यांना मिळालेली काही महत्त्वाची पारितोषिके पुढीलप्रमाणे:

* बेस्ट रिसर्च पेपर अवॉर्ड – इंडियन मॅथेमॅटिकल सोसायटी (२०११)
* भारत शिक्षण रत्न पुरस्कार (२०१२)
* लाइफटाईम एज्युकेशन एक्सलन्स अवॉर्ड (२०१३)
* ग्लोबल टीचर रोल मॉडेल अवॉर्ड (२०१५)
* हिंद रत्न पुरस्कार – हाउस ऑफ कॉमन्स, लंडन (२०१९)
* बेस्ट प्रिन्सिपल अवॉर्ड – IAMRF (२०२३)
* आउटस्टँडिंग लीडर इन हायर एज्युकेशन – ELETS (२०२४)
* लाइफटाईम अचिव्हमेंट अवॉर्ड – VDGOOD (२०२३)

**सामाजिक आणि शैक्षणिक योगदान**

* विविध संशोधन नियतकालिकांचे संपादक मंडळ सदस्य
* PH.D मार्गदर्शक व परीक्षक
* ९० हून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग
* एनएएसी मानांकन, रक्तदान शिबिरे, व भारत अस्मिता नॅशनल अवॉर्ड्स सारख्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग
* २०२३ मध्ये IOASD कडून रॉयल फेलो किताब
* भारतीय गणित संशोधनाचा अभिमान

डॉ. वाफरे यांना मिळालेला 'नोबेल रिसर्च अवॉर्ड' हा केवळ त्यांच्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण भारतासाठी गौरवाचा क्षण आहे. त्यांच्या कार्यातून नव्या पिढीला प्रेरणा मिळत राहील, आणि भारतीय गणित संशोधनाचे नाव जागतिक नकाशावर ठळकपणे उमटत राहील.

> "संशोधन ही केवळ माहितीची वाढ नसून, ती ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्याची एक सततची प्रक्रिया आहे. गणितासारख्या अमर्याद विषयातून नव्या शक्यतांचा शोध घेणे हेच माझे ध्येय आहे – विद्यार्थ्यांसाठी, संस्थेसाठी आणि देशाच्या प्रगतीसाठी."
> -डॉ. बाळासाहेब वाफरे, प्राचार्य.

### माजी नगरसेविका नम्रता लोंढे यांचा पुढाकार

# श्रीक्षेत्र भीमाशंकर दर्शन यात्रेस महिला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

## प्रभाग क्रमांक 8 मध्ये भव्य अध्यात्मिक उपक्रम




। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भोसरी विधानसभेचे लोकप्रिय आमदार महेश लांडगे यांच्या प्रेरणा आणि मार्गदर्शनाखाली, तसेच माजी नगरसेविका नम्रता योगेश लोंढे आणि राजर्षी शाहू महाराज प्रतिष्ठानचे संस्थापक योगेश लोंढे यांच्या संकल्पनेतून प्रभाग क्र. ८ - इंद्रायणीनगर आणि परिसरातील महिला भगिनींसाठी श्रावण महिन्याच्या निमित्ताने एक भव्य अध्यात्मिक दर्शन यात्रा आयोजित करण्यात आली.**

श्रावण महिन्यात १२ ज्योतिर्लिंगांपैकी सहावे ज्योतिर्लिंग असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर महादेव यांचे दर्शन घेणे अत्यंत पुण्यप्रद मानले जाते. याच पार्श्वभूमीवर या यात्रेत प्रभागातील तब्बल २ हजार ५४१ महिला भाविकांनी सहभाग नोंदवला.

यात्रेच्या आयोजनात महिलांच्या सुरक्षितता व सोयींचा विशेष विचार करण्यात आला. आरामदायी ट्रॅव्हल्स बसद्वारे सर्व महिलांची वाहतूक करण्यात आली. सकाळी नाश्ता व चहा, तसेच दुपारचे जेवण अशी उत्कृष्ट जेवण व्यवस्था करण्यात आली होती. संपूर्ण प्रवासात कुठलीही अडचण न येता अतिशय शिस्तबद्ध आणि सकारात्मक वातावरणात ही यात्रा पार पडली.

### अध्यात्मिक वातावरण, भाविकांचा आनंद:

श्रावण महिन्याच्या पवित्र वातावरणात भीमाशंकर महादेवाचे दर्शन घेतल्यावर सर्व महिलांनी आध्यात्मिक समाधान व्यक्त केले. भाविक महिलांच्या चेहऱ्यावर समाधानाचे आणि आनंदाचे भाव स्पष्ट दिसत होते. अनेक महिलांनी ही यात्रा "आयुष्यातील एक अविस्मरणीय अनुभव" असल्याचे सांगितले. या अध्यात्मिक यात्रेच्या माध्यमातून महिलांच्या सामाजिक व आध्यात्मिक बांधिलकीला बळ मिळाले. नम्रता लोंढे यांनी नेहमीच सामाजिक व अध्यात्मिक क्षेत्रात भरीव कार्य केले आहे. त्यांच्या समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचे हे उत्तम उदाहरण ठरले आहे. त्यांच्या अध्यात्मिक जाणिवा आणि महिलांसाठी असलेली संवेदना यामुळेच प्रभागातील महिलांना एकत्र येण्याची आणि भक्तिभावाने एकत्रित प्रवास करण्याची संधी मिळाली.मन



> भीमाशंकर दर्शन यात्रेच्या आयोजनानंतर महिला भगिनींनी समाधान व्यक्त केले आहे. अशा अध्यात्मिक उपक्रमांची पुनरावृत्ती व्हावी, अशी अपेक्षाही व्यक्त केली. या यात्रेच्या माध्यमातून भोसरीतील सामाजिक आणि अध्यात्मिक सौहार्दाचे उत्तम उदाहरण निर्माण झाले आहे."समाजाच्या जडणघडणीत अध्यात्मिक दृष्टिकोन महत्वाचा आहे. महिलांना एकत्र आणून श्रद्धेचा आणि समर्पणाचा अनुभव देणे हीच माझ्यासाठी खरी समाजसेवा आहे."
>
> **--नम्रता लोंढे,** माजी नगरसेविका.

### भीमाशंकर दर्शन यात्रेची वैशिष्ट्ये :

- २ हजार ५४१ महिला भाविकांचा सहभाग
- सुरक्षित, आरामदायी ट्रॅव्हल्स वाहतूक
- सकस नाश्ता, चहा व स्वादिष्ट जेवण
- कुशल नियोजन, कुठेही गालबोट न लागलेली यशस्वी यात्रा
- अध्यात्मिक वातावरण आणि भक्तिभावाने ओतप्रोत अनुभव